# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

क्रमांक: 2अ/एडीएम/2014/ 9263

दिनांक : 2 JUL 2014

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष 2014-15 मधील सर्व व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अल्पसंख्यांक संस्थांच्या अल्पसंख्यांक कोटयातील जागा व विनाअनुदानीत संस्थांच्या संस्थास्तरावरील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध करून देणेबाबत कार्यपध्दती

संदर्भ : 1) शासन निर्णय अल्पसंख्यांक विभाग क्रमांक अशैसं-2012/ प्र.क्र.21/ कार्या-5,दिनांक 27.5.2013

2) शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अशैसं -2012/ प्र.क्र.21/ कार्या-5, दिनांक 18.6.2014

शैक्षणिक वर्ष 2014-15 साठी व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहेत. संचालनालयाच्या वतीने राबविल्या जाणा-या प्रवेश प्रक्रियेसाठी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या संस्था तसेच खाजगी विनाअनुदानीत संस्था अनुक्रमे अल्पसंख्यांक कोटयातील तसेच संस्थास्तरावरील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी शासनाकडे समर्पित करतात.

यासंदर्भात कळविण्यात येते की, शासन निर्णय अल्पसंख्यांक विभाग क्रमांक **अशैसं-2012/ प्र.क्र.21/ कार्या-5,दिनांक 27.5.2013** अन्वये राज्यातील अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांसाठी कार्यपध्दती निर्धारीत करण्यात आली होती. याच शासन निर्णयातील मधील प्रवेशासंदर्भातील तरतूद 10) iv) येथील (अ),(ब) व (क) मध्ये शासनाने संदर्भाधीन दिनांक 18.6.2014 च्या शासन निर्णयान्वये सुधारणा केलेली आहे. (सोबत प्रत जोडली आहे). आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त संस्थांना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सदर शासन निर्णय आणि शासन परिपत्रकानुसार कार्यवाही अनुसरण्याबाबत कळविण्यात यावे.

तसेच खाजगी विनाअनुदानीत बिगर अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्था आणि अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना 20 टक्के संस्थास्तरावरील जागा असतात. त्या 20 टक्के जागांपैकी किती टक्के जागा संबंधित संस्था भरणार आहे याची माहिती संस्थेच्या संकेतांक (Institute Code) चा उपयोग करून Log In केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रम आणि विषयनिहाय जागांची टक्केवारी ऑनलाईन नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश पध्दतीमध्ये उपलब्ध होणा-या जागा विद्यार्थ्यांना दर्शविण्यात येतील. संस्थास्तरावरील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करण्याबाबत संस्थांनी पत्राद्वारे कळविले असेल तरीही असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. **केवळ ऑनलाईन पध्दतीने समर्पित केलेल्या जागांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत ग्राहय धरण्यात येईल ही बाब सर्व संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी.**

संस्थांना त्यांच्या संस्थास्तरावरील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी **दिनांक 5.7.2014 पर्यंत** मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करावयाच्या संस्थास्तरावरील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट करावी असे आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

**अतितात्काळ**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

क्र. तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४/ 2097

दि. 3 JUL 2014

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था, नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थास्थरावरील व अल्पसंख्यांक कोटयातील जागा ऑनलाईन समर्पित करण्याबाबतची कार्यवाही दि. ०५/०७/२०१४ पर्यंत संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्यावत करावी.

सहसंचालक,

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर